महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.२-ब/ ०१२५१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : १४/०१/२०१५

# परिपत्रक

विषय : महिला विद्युत सहाय्यक/लेखा सहाय्यक/कनिष्ठ सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक या पदावर कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांच्या प्रसुति रजेबाबत.

.....

म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियम अंतर्गत स्थायी किंवा अस्थायी महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुति रजेबाबतच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदरची रजा संबंधीत महिला कर्मचाऱ्याने अर्जासोबत सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या अधीन राहून मंजूर करण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

२. या संदर्भात कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीवर नियुक्त झालेल्या विद्युत सहाय्यक/लेखा सहाय्यक/कनिष्ठ सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक या पदांवर कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना मंजूर करावयाच्या प्रसुति रजेसंदर्भात काही क्षेत्रिय कार्यालयांकडून विचारणा करण्यात आली होती.

३. या अनुषंगाने सखोल परिक्षण करुन सक्षम अधिकारी यांनी महिला विद्युत सहाय्यक / लेखा सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक या नियुक्ती अटी व शर्तीनुसार प्रसुति रजेस पात्र नसल्याने ज्या महिला कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर विद्युत सहाय्यक / लेखा सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक या पदी रुजू झाल्या आहेत व ज्यांचा १ वर्षाचा कंत्राटी कालावधी पूर्ण झाला आहे अशा महिला कर्मचाऱ्यांना, स्थायी अथवा अस्थायी पदावर कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुति रजेच्या कालावधीइतका म्हणजेच जास्तीत जास्त १८० दिवसांपर्यंत प्रसुति दरम्यान घेतलेल्या/उपभोगलेल्या रजा या सर्वसाधारण बिनपगारी रजा म्हणून ग्राह्य धरण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे. तथापि, प्रसुति दरम्यानच्या सदर रजेच्या कालावधीमध्ये संबंधीत महिला विद्युत सहाय्यक / लेखा सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक या पदाकरिता देय असलेला कोणत्याही प्रकारचा भत्ता/विशेष वेतन मिळण्यास पात्र राहणार नाहीत. त्याचप्रमाणे अशा महिला कर्मचाऱ्यांच्या सदर रजेच्या कालावधीएवढा कंत्राटी कालावधी वाढविण्यात यावा.

४. कर्मचारी सेवाविनियम क्र.५३ मधील इतर तदतुदी अबाधित राहतील.

५. सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून लागू राहील.

६. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

*D:\O&M\Circular-Maternity Leave on Contract basis.doc*